प्रेसनोट दि. ०३/१२/२०१७

**चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील एस.बी.आय.बँक, बाणेर रोड, बाणेर, पुणे येथुन एका इसमांस मारहाण करुन त्यांचेकडील रोख रक्कमेची बॅग बळजबरीने चोरुन नेणा-या चोरट्यांना गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडून १२ तासाचे आत अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.**

------------------------------------ooo------------------------------------

दिनांक ०२/१२/२०१७ रोजी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील एस.बी.आय.बँक, बाणेर रोड, बाणेर, पुणे येथुन एका इसमांस मारहाण करुन त्यांचेकडील रोख रक्कमेची बॅग बळजबरीने चोरुन नेलेबाबत चतुःश्रृंगी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५७२/२०१७ भादवि कलम ३९४, ३४ प्रमाणे दाखल गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना गुन्हेगारांनी गुन्हा करतेवेळी वापरलेली बजाज पल्सर नं- एम एच-१४/--४४६० ह्या गाडीवरील तीन अनोळखी इसमांचा शोध घोणेकामी चतुःश्रृंगी, हिंजवडी, वाकड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात पेट्रोलींग फिरत असताना फिरत फिरत २१/३० वा सुमारास ताथवडे, अशोकनगर झोपडपट्टी परिसराकडे जात असताना अशोकनगर, जे.एस.पी.एम. कॉलेज समोरुन एक बजाज पल्सर मोटार सायकल नं-एम एच-१४/एफ.डब्ल्यु-४४६० वरुन तिन इसम संशयीतरित्या ट्रिपल शिट येताना दिसेले. त्यांचा आम्हाला संशय आल्यांने व त्यांचे मोटर सायकलचा नंबर एम एच-१४/ ४४६० हा दाखल गुन्ह्यांत वापरलेल्या मोटर सायकलचा असल्यांचे लक्षात येताच त्यांचे मोटार सायकलला सरकारी वाहन आडवे लावुन सदर इसमांना थांबवुन स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्यांना त्यांची नावे पत्ते विचारता त्यांनी त्यांचे नाव पत्ते १)प्रमोद व्यंकटेश तेलगु, वय-१९ वर्षे रा. शीतळा नगर २, देहुरोड, पुणे २)उमेश आदीनारायण बोया, वय-१९ वर्षे रा.सदर ३)योगेश धनराज द्रविड, वय-२२ वर्षे रा. शीतळा नगर १, देहुरोड, पुणे असे असल्यांचे सांगीतले त्यांचेकडे दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने तपास करता त्यांनी एस.बी.आय.बँक, बाणेर रोड, बाणेर, पुणे येथुन एका इसमांस मारहाण करुन त्यांचेकडील रोख रक्कमेची बॅग बळजबरीने काढून घेवुन त्यांतील रक्कम आपसात वाटुन घेतलेली आहे असे सांगीतले. सदरची रोख रक्कम रुपये २,७३,०००/- व त्यांनी गुन्ह्यांत वापरलेली कि.रु ९०,०००/-.ची बजाज पल्सर २२० मोटार सायकल नं-एम एच-१४/एफ.डब्ल्यु-४४६० असा एकुण ३,६३०००/- चा माल हस्तगत करुन सदरचा दाखल गुन्हा १२ तासाचे आत उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, श्री प्रदीप देशपांडे, मा.पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे, मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण, लक्ष्मण ढेंगळे, पोलीस उप निरीक्षक संजय दळवी, यशवंत आब्रे, विनायक पवार, निलेश पाटील, बशीर सय्यद, महेश कदम, सचिन गायकवाड, शैलेश सुर्वे, दत्तात्रय काटम, अजय थोरात, मल्लिकार्जुन स्वामी, रामदास गोणते, परवेज जमादार व प्रविण जाधव यांनी केली आहे.